# दारू व तंबाखुमुक्त गडचिरोली जिल्हा 'मुक्तिपथ' अभियान अंतर्गत पद भरती

गडचिरोली जिल्हा दारू व तंबाखू मुक्त व्हावा या प्रमूख हेतूने **'मुक्तिपथ'** हे अभियान गडचिरोली जिल्हयात सर्च संस्थेद्वारा सन. २०१६ पासून सुरु आहे. सध्या स्थितीत जिल्ह्यातील १५०० गावापैकी ६०० गावात दारूविक्री बंद असून ११०० गावात सक्रीय गावसंघटना स्थापन केल्या आहे. पुढील यशाच्या वाटचालीकरिता आगामी तीन वर्षासाठी तालुका संघटक, उपसंघटक व प्रेरक हि पदे, रिक्त असलेल्या पदानुसार भरायचे आहेत. गडचिरोली जिल्हयातील सर्व १२ तालुक्यात विविध शासकीय विभाग, शिक्षण संस्था, गाव पातळीवरील संघटना पदाधिकारी व स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने हे काम सुरु आहे. याच्या अंमलबजावणीसाठी पूर्ण वेळ कार्यकर्ते नेमलेले आहेत. जिल्हयाच्या १५०० गावात काम सुरु आहे. भारत देशामधे अशा पध्दतीने होणारे हे पहिले अभियान असून निश्चितच संपूर्ण देशासाठी पथदर्शी ठरणारे आहे.

**संपर्काकरिता पत्ता –**
**' मुक्तिपथ'**
आरमोरी रोड, पाण्याच्या टाकी समोर, मु.पो.ता.जि. गडचिरोली,४४२६०५
मो.न. ०७१३२-२३२७२०

- **सध्या एकूण रिक्त पदे –**

1) **सामाजिक कार्यकर्ता :-** तालुका संघटक – २ पदे , तालुका उपसंघटक – ४ पदे, तालुका प्रेरक – ८ पदे
2) **कम्युनिकेशन असोसिएट** (कंटेंट डेव्हलपमेंट):- पार्ट टाईम – पद -१

- **तिन्ही पदाकरिता कामाचे स्वरूप** – गडचिरोली जिल्हयात दिलेल्या तालुक्याच्या ठिकाणी राहून तालुक्यातील सर्व गावांमधे दारू व तंबाखू नियंत्रणा करिता, विविध शासकीय अधिकारी, गाव समुदाय, शहरी समुदाय इत्यादींसोबत व्यापक जनजागृती, संघटन, समित्या स्थापन करणे, प्रशिक्षण करणे, सभा घेणे, कायदयाची अंमलबजावणी करवून घेणे, व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन, अहवाल लिहणे इ. कामे करणे.
- 

## पद 1 – तालुका संघटक पदा करिता पात्रता निकष

### अनिवार्य (Essential qualification)

- **शिक्षण** – उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण उत्तीर्ण झालेला - MSW/MA-Psychology/MA in Social work/MPH/MA-Sociology/ Post Graduation Diploma in Rural Development/MA- Political science/MBA असावा.
- **भाषा** – मराठी लिहिता, वाचता व बोलता यावी व इंग्रजी भाषा लिहता व वाचता यावी. (मराठी सह तेलगू, बंगाली, गोंडी भाषा येत असल्यास उत्तम)
- **वयोमर्यादा** – २५ ते ४० वर्षे.

- **अनुभव**–

- ग्रामीण विकास, सामाजिक संघटन, सामाजिक शिक्षण आणि सामाजिक प्रशासन, प्रशिक्षण अशा कामांचा तसेच गट नेतृत्व, कार्यक्रम व्यवस्थापन याचा स्वयंसेवी संस्थेतील किंवा शासकीय, निमशासकीय कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असावा **किंवा** फ्रेशर पण आवश्यक कौशल्यप्राप्त उमेदवार असावा.
- स्वतः दारू व तंबाखू वापरणारा नसावा.
- तालुकाभर फिरून काम करण्याची तयारी असावी.
- अपयशाने हताश न होणारा, संवेदनशील, उत्साह व उर्जेने काम करणारा असावा.
- दारू तंबाखूमुक्ती करिता काम करण्याची तळमळ, आस्था व प्रसंगी विरोध सहन करण्याची तयारी असलेला व निर्भय वृत्तीचा असावा, भ्रष्ट नसावा.

- **वाहन परवाना**

  दुचाकी वाहन चालविता येणे व वाहन चालविण्याचा परवाना असावा.

- अभियाना अंतर्गत तिन वर्षे पूर्ण वेळ काम करावे लागेल.

## इष्ट (Desirable qualification) पात्रता

- **लिंग** – पुरूष किंवा स्त्री
- **गुण वैशिष्टये**

- उमेदवाराकडे उत्तम संवाद कौशल्य, संघटन बांधणी व व्यवस्थापन, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, किर्तन करणे यापैकी एक किंवा अनेक कौशल्य असल्यास प्राधान्य दिल्या जाईल.
- समस्या सोडविण्याचे कौशल्य व वृत्ती असावी.

- **संगणक ज्ञान** – MSCIT उत्तीर्ण किंवा EXCEL, POWERPOINT, MICROSOFT WORD इत्यादीचे ज्ञान असून ते वापरता यावे.
- **वेतन व सुविधा** – दरमहा मानधन रू.१८०००-२२०००/- + पीएफ, फोन भत्ता, घरभाडे भत्ता तसेच कामाच्या सुविधेकरिता तालुका पातळीवर कार्यालय, दुचाकी वाहन, लॅपटॉप, एल.सी.डी प्रोजक्टर, कॅमेरा इत्यादी असेल.

## पद 2 - तालुका उपसंघटक पदा करिता पात्रता निकष

## अनिवार्य (Essential qualification)

- **शिक्षण** – उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापिठातून पदव्युत्तर/पदवी शिक्षण उत्तीर्ण झालेला किमान – MSW/BSW/BA-SOCIAL SCIENCES/BE/BPEd असावा.
- **भाषा** – मराठी लिहिता, वाचता व बोलता यावी व इंग्रजी भाषा लिहता व वाचता यावी. (मराठी सह तेलगू, बंगाली, गोंडी भाषा येत असल्यास उत्तम)
- **वयोमर्यादा** – २५ ते ४० वर्षे.

- **अनुभव**

- ग्रामीण विकास, सामाजिक संघटन, सामाजिक शिक्षण आणि सामाजिक प्रशासन, प्रशिक्षण, कार्यक्रम व्यवस्थापन इत्यादी कामाचा स्वयंसेवी संस्थेतील किंवा शासकीय, निमशासकीय कामाचा किमान 2 वर्षाचा अनुभव असावा. **किंवा** फ्रेशर पण आवश्यक कौशल्यप्राप्त उमेदवार असावा.
- स्वतः दारू व तंबाखू वापरणारा नसावा.
- तालुकाभर फिरून काम करण्याची तयारी,

- **वाहन परवाना**

- दुचाकी वाहन चालविता येणे व वाहन चालविण्याचा परवाना असणे अनिवार्य.

- अभियानाअंतर्गत तिन वर्षे पूर्ण वेळ काम करावे लागेल.

**इष्ट (Desirable qualification) पात्रता**

- **लिंग** – पुरूष किंवा स्त्री
- **गुण वैशिष्टये** –

- उमेदवाराकडे उत्तम संवाद कौशल्य, गट नेतृत्व, संघटन बांधणी व व्यवस्थापन, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, किर्तन करणे यापैकी एक किंवा अनेक कौशल्य असल्यास प्राधान्य दिल्या जाईल.
- दारू तंबाखूमुक्ती करिता काम करण्याची तळमळ, आस्था व प्रसंगी विरोध सहन करण्याची तयारी असलेला व निर्भय वृत्तीचा असावा व भ्रष्ट नसावा.
- अपयशाने हताश न होणारा, संवेदनशील, उत्साह व उर्जेने काम करणारा असावा.
- समस्या सोडविण्याचे कौशल्य व वृत्ती असावी.

- **संगणक ज्ञान** – MSCIT उत्तिर्ण किंवा EXCEL, POWERPOINT, MICROSOFT WORD इत्यादीचे ज्ञान असून ते वापरता यावे.
- **रहिवासी** – उमेदवार हा विदर्भातील रहिवासी असावा.
- **वेतन व सुविधा** – दरमहा मानधन रू. १५-१७०००/-+ पीएफ, फोन भत्ता, घरभाडे भत्ता तसेच कामाच्या सुविधेकरिता तालुका पातळीवर कार्यालय, दुचाकी वाहन, लॅपटॉप, एल.सी.डी प्रोजक्टर, कॅमेरा इत्यादी असेल.

**पद 3 - तालुका प्रेरक पदा करिता पात्रता निकष**

**अनिवार्य (Essential qualification)**

- **रहिवासी** – उमेदवार तालुक्याच्या ठिकाणी निवासी राहण्यास तयार असावा.
- **लिंग** – पुरूष / स्त्री
- **शिक्षण** – उमेदवार हा किमान पदवीधर असावा.
- **भाषा** – मराठी भाषा लिहिता बोलता व वाचता यावी. (मराठी सह तेलगू, बंगाली, गोंडी भाषा येत असल्यास उत्तम)
- **वयोमर्यादा** – २२ ते ५० वर्षे.

- **अनुभव** –

  - स्थानिक पातळीवर संघटन, गाव विकास, नेतृत्व, बैठकांमधे सहभाग, इ. सामाजिक कामाचा किमान १/२ वर्षाचा अनुभव असावा. **किंवा** फ्रेशर पण आवश्यक कौशल्यप्राप्त उमेदवार असावा.

- स्वतः दारू व तंबाखू वापरणारा नसावा.
- तालूकाभर फिरून काम करण्याची तयारी असावी.

- **वाहन परवाना**

- दुचाकी वाहन चालविता येणे व वाहन चालविण्याचा परवाना असणे अनिवार्य.

- अभियाना अंतर्गत तिन वर्षे पूर्ण वेळ काम करावे लागेल.

**इष्ट (Desirable qualification) पात्रता**

- **गुण वैशिष्टये**

- उमेदवाराकडे उत्तम संवाद कौशल्य, संघटन, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, यापैकी एक किंवा अनेक कौशल्य असल्यास प्राधान्य दिल्या जाईल.
- दारू तंबाखूमुक्ती करिता काम करण्याची तळमळ, आस्था व प्रसंगी विरोध सहन करण्याची तयारी असलेला व निर्भय वृत्तीचा असावा व भ्रष्ट नसावा.
- समस्या सोडविण्याचे कौशल्य व वृत्ती असावी.
- अपयशाने हताश न होणारा, संवेदनशिल, उत्साह व उर्जेने काम करणारा असावा.
- मराठीसह गोंडी व तेलगू भाषा बोलता येण्यास प्राधान्य.

- **वेतन व सुविधा** – दरमहा मानधन रू. १०-१३०००/-+ पीएफ, फोन भत्ता, घरभाडे भत्ता तसेच कामाच्या सुविधेकरिता तालुका पातळीवर कार्यालय, दुचाकी वाहन, इत्यादी असेल.

- **कम्युनिकेशन असोसिएट (कंटेंट डेव्हलपमेंट):- पार्ट टाईम – पद -१**

  **पात्रता** :- मास कम्युनिकेशन/डिप्लोमा डिग्री / पत्रकारिता

  **अनुभव** :- सोशल मिडिया & आय इ सी, बी.सी.सी. कंटेंट डेव्हलपमेंट तसेच डिझायनिंग, व्हिडीओ शुटींग, एडिटिंग, & सोशल मिडिया कंटेंट इत्यादी.

- **अर्ज कसा करावा :-** सदर पदाकरिता अर्ज करण्यासाठी त्या पदासाठी आवश्यक असलेली माहिती नीट वाचावी. संबधित पदाच्या निकषाची पूर्तता तुमच्याद्वारे पूर्ण होत असल्यासच अर्ज करावा. अर्ज करतांना प्रथम **उमेदवाराचा अर्ज ह्या फॉर्मची प्रिंट घेऊन** त्या फॉर्म मध्ये आवश्यक सर्व सत्य माहिती भरावी. हा भरलेला अर्ज स्कॅन करून+ सविस्तर Bio-data जोडावा, सोबत आवश्यक सर्व शैक्षिणिक, अनुभव प्रमाणपत्र तसेच आधारकार्ड, वाहन परवाना इत्यादी जोडलेले असावे. हे सर्व या email :- apply4muktipath@gmail.com वर पाठवावे. (उमेदवार अर्ज फॉर्म सर्वात शेवटी सलग्न आहे.)

- **टीप :-** कम्युनिकेशन असोसिएट पदाकरिता फक्त Bio-data + अनुभव असल्यास प्रमाणपत्र पाठवा.